Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# भारतीय शिक्षण पद्धतीचा इतिहास

**विनोद मच्छिंद्रनाथ बर्डे,**
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.

**प्रस्तावना**

प्राचीन भारतातील शिक्षणाचा विचार करताना आपणास स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण अशा विविध कालखंडातील शिक्षण पद्धती यांचा विचार करावा लागतो.प्राचीन शिक्षण पद्धतीत मनुष्याच्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यावर, धर्माचा पगडा बराच आहे. प्राचीन काळी शिक्षणाची सुरुवात ही वयाच्या पाचव्या वर्षी होई. प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ होऊन मुले अक्षरे शिकू लागत. अक्षरांची त्यांची ओळख होऊ लागली. त्यानंतर वयाच्या आठव्या वर्षी उपनयन संस्कार केला जात असे. हा संस्कार म्हणजे विद्यार्थ्याला गुरूगृही राहून, पुढील शिक्षण घेण्याची परवानगी विद्यार्थ्याला मिळत असे. प्राचीन काळी आचार्यकुल किंवा गुरुकुल सारखे आश्रम किंवा तक्षशीला सारखी विद्यापीठे होती. त्या काळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या सर्वांना शिक्षण मिळत असे. मात्र शूद्रांना वेदाच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागत असे. शूद्रांना पिढ्यान पिढ्या चालत आलेले उद्योग व्यवसायांचे शिक्षण वाडवडिलांकडून किंवा तज्ञांकडून मिळत असे. शब्दसंग्रह ज्ञान भांडार वाढू लागले. तसेच मौखिक शिक्षण पाठांतर जतन करणे अवघड वाटू लागले. लिहिण्याची कला उपलब्ध झाल्यानंतर ग्रंथाची निर्मिती होऊ लागली.

ब्राह्मण आणि तीन वर्णांना आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद इत्यादी उपजीविका यांच्या विद्या तसेच क्षत्रियांना विशेषता धनुर्विद्या, दंडनिती यांचे शिक्षण दिले जात असे. तसेच ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद अथर्ववेदाचे शिक्षण दिले जाई.

**बौद्ध अभ्यासक्रम**

महायान मतांचा भारतात प्रसार झाला. व त्याचे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत असतात. त्यामुळे बौद्ध विद्यार्थ्यांना संस्कृत व्याकरण, कोश व साहित्य शिकवले जात असे. सोळाव्या वर्षी त्यांच्या उच्च शिक्षणास प्रारंभ होई आणि त्याचा तर्क व तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास करण्यावर भर असे. विहारात बौद्ध भिक्षू विद्यादानाचे काम करीत असत. त्या काळात प्राथमिक शिक्षणामध्ये लिहिण्या-वाचण्याची शिक्षण दिले जात असे. त्यानंतर सातव्या वर्षी पाच प्रमुख शास्त्रांचे व्याकरण, हस्तकौशल्य, वैद्यकशास्त्र, न्यायशास्त्र आणि अध्यात्म अशा क्रमाने त्यांना शिक्षण दिले जात असे. वेद काळात तसेच बुद्ध काळात भारतामध्ये काही महत्त्वाची विद्यापीठे होती. चांगली शिक्षण केंद्रे म्हणून ती मान्य पावलेली होती. ही केंद्रे म्हणजे 1. तक्षशिला 2. नालंदा 3. विक्रमशिला 4. मिथीला 5.वल्लभी

**मुस्लीम काळातील शिक्षण पद्धती**

तेराव्या-चौदाव्या शतकापासून मुसलमानांच्या धार्मिक सांस्कृतिक कल्पनांचा हिंदुस्थानातील शिक्षणावर प्रभाव पडू लागला. मुसलमानांनी मशिदीत व मदरसा या हिंदु सारख्या पाठशाळा सुरू केल्या. प्राथमिक शिक्षण या प्रमाणे उच्च शिक्षणही धर्मा भोवती केंद्रित झाले. मोगलांनी राजकीय कारणासाठी शिक्षणाचा अवलंब केला. दिल्ली येथे 1000 हुंन आधिक मदरसा होत्या. आजही भारतामध्ये हजारांवर मदरसा आहेत. आणि आजही धर्म भोवती शिक्षण दिले जाते.

**इंग्रज काळातील शिक्षण पद्धती**

इ.स. सन 1659 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी भारतात व्यापाराबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न केले. त्यांनी अनेक मिशनरी स्कूल सुरू केल्या. प्लासीच्या लढाईनंतर ईस्ट इंडिया कंपनीला राजकीय सत्ता मिळाली. मात्र कंपनीने हिंदुच्या पाठशाळा व मुसलमानांच्या मदरसा यांना पुरस्कार देण्याचे धोरण तसेच चालू ठेवले.1813 मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून भारतातील लोकांचे शिक्षण ही ईस्ट इंडिया कंपनीच्या कामाचा भाग म्हणून मान्य केल. चार्टर एक्ट मंजूर झाल्यानंतर शिक्षणाच्या दृष्टीने भारतात बऱ्याच गोष्टी

घडल्या 1813 चार्टर ॲक्ट मधून बरेच प्रश्न निर्माण झाले. उदाहरणार्थ शिक्षणाची पद्धत, माध्यम भारतामध्ये 1813 ते 1856 या काळात पुढील प्रमाणे शाळा उपलब्ध होत्या.1. मिशनरी शाळा 2. ब्रिटिशांनी खाजगी रीत्या सुरु केलेल्या शाळा 3. भारतीयांनी चालवलेल्या खाजगी शाळा 4. जुन्या पद्धतीच्या पाठशाळा व मदरसा

1857 साली मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विद्यापीठे स्थापन झाली. 1902 साली लॉर्ड कर्झनने शिक्षण विषयी धोरण मांडले. लॉर्ड कर्झनने प्राथमिक शिक्षणासाठी अधिक अनुदान मंजूर केल्याने प्राथमिक शिक्षणाची खूपच वाढ झाली. लॉर्ड कर्झन यांनी सर थॉमस राल्फ यांच्या नेतृत्वाखाली राल्फ कमिशनची स्थापना केली. यालाच 'भारतीय विद्यापीठ आयोग' असे म्हणतात. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भारतीय राजाराम मोहन रॉय यांनी विशेष कार्य केले. त्यांनी ॲंग्लो हिंदू शाळेची स्थापना केली.

**राष्ट्रीय शिक्षण**

कलकत्ता येथील इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या राष्ट्रीय सभेमध्ये जे ठराव झाले. त्यामध्ये स्वदेशी माल वापरावा व परदेशी मालावर बहिष्कार घालावा. लोकमान्य टिळक प्रमुख होते. स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही स्वातंत्र्य चळवळीची चतु: सूत्री महत्त्वाची ठरली, राष्ट्रीय शिक्षणाने येणारी नवी पिढी सतेज, स्वाभिमानी आणि स्वातंत्र्य करिता प्रयत्न करणारी होईल. अशी लोकमान्यांची कल्पना होती. राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थांची संघटना करून त्यांना मार्गदर्शन करण्याकरता आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याकरिता 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' या नावाची संस्था 1921 साली पुण्यात स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रा बाहेर ही राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था होत्या. 10 फेब्रुवारी 1921 रोजी महात्मा गांधी यांच्या हस्ते काशी येथे 'राष्ट्रीय विद्यापीठाची' स्थापना झाली. स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्मारक म्हणून गुरुकुल कांग्री विश्वविद्यालयाशी संलग्न अशी दयानंद ॲंग्लो वैदिक संस्था स्थापना झाली. 28 डिसेंबर 1910 रोजी स्थापन झालेले दक्षिणामूर्ति विद्याभवन ही एक नव्या प्रकारची संस्था होती. ही संस्था प्राथमिक शिक्षणावर भर देत असत. रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतन आणि विश्वभारती या संस्था आणि राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्था होत. देशाच्या शैक्षणिक इतिहासात या संस्थांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.

**स्वातंत्र्यानंतरच्या काळातील शिक्षण पद्धती**

स्वातंत्र्योत्तर काळात विद्यापीठ शिक्षण आयोग नेमण्यात आला. या आयोगाने विद्यापीठे तसेच माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे सांगितली. देशाच्या शिक्षणाच्या इतिहासातील युगप्रवर्तक घटना म्हणजे भारतीय शिक्षण आयोग यास 'कोठारी आयोग' असेही संबोधले जाते. आजपर्यंत एकूण पाच शिक्षण आयोग नेमण्यात आले आहेत. शिक्षणाचा विचार करताना सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाचा विचार करावा. देशभर 10+2+3 आकृतीबंध निवडावा. शिक्षणावरील खर्च अंदाजपत्रकातील खर्चाच्या रकमेच्या तीन टक्के यावरून सहा टक्के करावा. शिक्षण हा केंद्र व राज्य सरकारे यामधील सामायिक विषय आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** (1968)

भारताच्या लोकसभेचे 1968 मध्ये भारताचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा मंजूर केला. या काळात उच्च शिक्षण व संशोधन याकडे अधिकाधिक लक्ष देण्यात येऊ लागले. माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात या काळात 1972 पासून नवा आकृतीबंध सुरू झाला. कोठारी आयोगाच्या शिफारशी प्रमाणे प्रत्येक मुलाला मातृभाषा, हिंदी ही राष्ट्रभाषा आणि इंग्रजी ही व्यवहारातील भाषा यावी असे ठरले होते. पाठ्यपुस्तके व इतर पुस्तकांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. प्रत्येक राज्यात पाठ्यपुस्तक मंडळे स्थापन झाली. स्त्री शिक्षणातील या काळात फारशी प्रगती झाली नाही. अनुसूचित जाती व जमाती व आदिवासी यांच्या शिक्षणात लक्षणीय वाढ झाली. याच काळात अनेक कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आली.

**समारोप**

पुरातन काळात भारतात गुरुकुल पद्धती होती. भारतात शिक्षण आणि शिक्षण पद्धतीचा विकास ब्रिटिश राजवटीत झाला. ब्रिटिशांनी महाविद्यालय आणि विद्यापीठे स्थापन करून दर्जेदार शिक्षण पद्धती भारतात अस्तित्वात आणली. कला, वाणिज्य, शास्त्र, अभियांत्रिकी, कृषी शिक्षणाची महाविद्यालय सुरू केली. प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालयीन शिक्षण पद्धती अस्तित्वात आली. शिक्षण आणि संशोधन संस्था स्थापन केल्या. पदवीपूर्व आणि पदव्युत्तर शिक्षण वेगवेगळ्या महाविद्यालयांमधून दिले जाऊ

लागले. शिक्षणाचा दर्जा राखण्यावर त्यांनी भर दिला. शिक्षण क्षेत्रात शिस्त आणि उत्तम दर्जा यास महत्त्व दिले.

**संदर्भ ग्रंथ**

1 डॉ.अळतेकर, सदाशिव अनंत. *प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती.*

2. आपटे, पां. श्री. *राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास*, पुणे, १९५८

3.https://mr.m.wikipedia.org/wiki/प्राचीन_ भारतीय_ शिक्षण_ पद्धती